ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत.(श्री.लोंढे भास्कर
तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत हिवरे
कोरडा तालुका पारनेर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२५६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र /ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/५८०/२०२३
दिनांक- ०२/०८/२०२३
२.या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३८/२०२४
दिनांक- २३/०१/२०२४ (चौकशी अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/
खाचौ /सी.आर.२०/२०२४, दिनांक- २२/०४/२०२५ प्राप्त दि.१७/०६/२०२५
४.विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात
मधील परिशिष्ठ ७.१
५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील
नियम ४ (३) व ४ (२)
६. या कार्यालयाकडील पत्र क्र .साप्रवि-२/ग्रापं-३/२४०/२०२५ दि.०७/१०/२०२५
(अंतिम कारणे दाखवा नोटीस)
७. गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचे पत्र क्र.आस्था-२/११४०/२०२५,
दि.०६/११/२०२५ नुसार श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक
ग्रामपंचायत वडगाव सावताळ, ता.पारनेर यांनी सादर केलेला खुलासा

श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वडगाव सावताळ, तालुका पारनेर यांनी ग्रामपंचायत कार्यालीयन कामी गैरशिस्त व गैरव्यवहार केल्याने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ०२ नुसार श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक यांचे गैरशिस्त व गैरव्यवहार विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये खालील प्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत.चौकशी अहवालाचा निष्कर्ष गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अपचारी यांचे वर ठेवलेले आरोप क्रमांक | विभागीय चौकशीमध्ये दोषारोपावरील प्राप्त निष्कर्ष |
|---|---|
| आरोप क्रमांक १ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्रमांक २ | आरोप सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ३ | आरोप अंशत: सिध्द होतो. |
| आरोप क्रमांक ४ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्रमांक ५ | आरोप सिध्द होत नाही. |
| आरोप क्रमांक ६ | आरोप सिध्द होतो. |

वरीलप्रमाणे श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वडगाव सावताळ तालुका पारनेर यांचे वर ठेवण्यात आलेले ०६ दोषारोपांपैकी ०१ आरोप अंशत: सिध्द होतो, ०३ आरोप सिध्द होत नाही व ०२ आरोप सिध्द होतात विभागीय चौकशी मध्ये सिध्द झालेले आहे. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शवून विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष पाहता श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरशिस्त व गैरव्यवहार करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

सबब, श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वडगाव सावताळ, ता. पारनेर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (३) नुसार ग्रामपंचायतीस पोहोचलेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची सर्व रक्कम किंवा तिचा भाग वसूल करणे व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील दोन वेतनवाढी कायम स्वरुपात रोखुन धरण्याची ही शिक्षा का करणेत येऊ नये?,याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. याबाबतचा नोटीसचा खुलासा संदर्भ क्र.७ नुसार सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन करण्यात आलेले असुन श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक यांच्या खुलाश्याचे अनुषंगाने त्यांना या आदेशान्वये पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल, अशारितीने एक वर्ष रोखणे, ही शिक्षा अंतिम करण्यात येत असुन या आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०८१८०६०१२१ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 21:16:17
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:-

श्री लोंढे भास्कर तुकाराम, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वडगाव सावताळ तालुका पारनेर
व्दारा व प्रत - गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर

२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.